सन १९७५ ते १९७७ मधील आणिबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणा-या ज्या व्यक्तींना बंदीवास सोसावा लागला अशा व्यक्तींना देण्यात येणा-या मानधनाकरीता अनुदान वितरण करणेबाबत . ...

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक: निवृवे १०१८/प्र.क्र.२०६/२०१८/स्वासैक-१
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ३ मे, २०१९.

वाचा :- १.शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/प्र क्र २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१ दि.१४/०२/२०१८
२. शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/प्र क्र २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१ दि.०३/०७/२०१८
३. शासन निर्णय क्रमांक अर्थसं१०१८/प्र क्र११५/(२०१८)/स्वासैक-१ दि.१३/११/२०१८
४. शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/ प्र क्र २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१ दि.१५/११/२०१८
५. शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/ प्र क्र २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१ दि.२८/०१/२०१९
६. शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/ प्र क्र २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१ दि.०७/०३/२०१९
७. शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/ प्र क्र २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१ दि.२७/०३/२०१९
८. शासन निर्णय क्रमांक निवृवे-१०१५/ प्र क्र २६१/२०१५(२०१८)/स्वासैक-१ दि.३०/०३/२०१९चे पत्र
९. जिल्हाधिकारी नागपूर यांचे क्र अजिदं/गृह/कक्ष१४(६)/कावि३१/२०१९ दि २८/०३/२०१९ चे पत्र
१०. जिल्हाधिकारी नागपूर यांचे क्र २०१८ अजिदं/गृह/कक्ष१४(६)/कावि२५/२०१९ दिनांक २५/०३/२०१९ चे पत्र
११. जिल्हाधिकारी बुलढाणा यांचे क्र गृहविभाग/कक्ष४(२)/कावि/३०४/२०१९ दि १६/०३/२०१९ चे पत्र
१२. जिल्हाधिकारी सातारा यांचे क्र संगायो/कावि/४७०/ दि ३१/०३/२०१९ चे पत्र

<u>प्रस्तावना</u> :-

भारतामध्ये दिनांक २५.६.१९७५ ते दिनांक ३१.३.१९७७ या कालावधीत आणिबाणी घोषित करण्यात आली होती. या कालावधीत ज्या व्यक्तींना कारावास सोसावा लागला, अशा व्यक्तींना आर्थिक मदत देऊन त्यांचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासाठी धोरण ठरविण्यात आलेले आहे.सदर धोरणांतर्गत पात्र असलेल्या व्यक्तींना मानधन मंजूर करण्याची बाब विचाराधीन आहे.

<u>शासन निर्णय</u> : -

ि सन १९७५ ते १९७७ मधील आणिबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरिता लढा देणा-या ज्या व्यक्तींना बंदीवास सोसावा लागला अशा व्यक्तींचा सन्मान/यथोचित गौरव करण्यासंबंधीच्या धोरणाची अंमलबजावणी करण्याकरीता आवश्यक असलेल्या निधीचे वितरण शासन निर्णयासोबत जोडलेल्या विवरणपत्रात दर्शविलेला असून मागणी क्र ए-०५ प्रधानलेखाशीर्ष २२३५ सामाजिक सुरक्षा व कल्याण , १०२- सामाजिक सुरक्षेखालील निवृत्तीवेतने,(००)(०५) आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरीता लढा देणा-या व्यक्तींना आर्थिक मदत (अनिवार्य) ५० इतर खर्च (२२३५ C२०५) या योजनेची तरतूद पुरवणी मागणीव्दारे मंजूर करण्यात आलेली आहे. सदरची **रक्कम रु ४२,००,०,०००/- (रुपये बेचाळीस कोटी फक्त)** इतकी असून या रकमेपैकी राज्यातील ३ जिल्हयांकरीता (नागपूर,बुलढाणा,सातारा) वितरीत करणे आवश्यक आहे.संबंधित जिल्हाधिका-यांनी शासनास सादर केलेल्या, पात्र अर्जदारांच्या यादीनुसार **माहे जानेवारी २०१८ ते मार्च २०१९ या १५ महिन्यांकरीता** ४,७६,२५०००/-(रु चार कोटी शहात्तर लाख पंचवीस हजार फक्त)इतकी रक्कम त्यांच्या जिल्ह्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या अनुदानाच्या रकमे प्रमाणे वितरीत करण्यात येत आहे.

२. सर्व जिल्हाधिकाऱ्यांनी त्यांना वितरीत केलेल्या अनुदानापेक्षा अधिक खर्च होणार नाही, तसेच शासन मान्यता प्राप्त बाबीकरीताच खर्च करण्याबाबत दक्षता घ्यावी. तसेच मासिक निधी वितरण प्रणालीनुसार अनुदान खर्च करण्यात यावे.

३. याप्रित्यर्थचा खर्च चालू आर्थिक वर्षातील खर्च मागणी क्र.ए-५,२२३५-सामाजिक सुरक्षा व कल्याण, १०२- सामाजिक सुरक्षा योजनेखाली निवृत्तीवेतन, (००) (०५) आणीबाणीच्या कालावधीत लोकशाहीकरीता लढा देणा-या व्यक्तींना आर्थिक मदत (अनिवार्य) ५० इतर खर्च (२२३५C२०५) या लेंखाशीर्षाखालील सन २०१९-२० या वित्तिय वर्षाच्या मंजूर अंदाजपत्रकीय तरतुदीतून भागविण्यात यावा आणि त्याच लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यांत यावा.

४. पात्र अर्जदारास संदर्भाधीन दिनांक ०३ जुलै २०१८च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिनांक ०२.०१.२०१८ पासून मानधन मंजूर करण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्रमांक ८/२०१९/व्यय-४ दिनांक ०३.०१.२०१९ अन्वये दिलेल्या मंजूरी अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०१९०५०३११०२२७७२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Digitally signed by Hemant G Mhapankar
Date: 2019.05.03 11:09:20 +05'30'

(हे. गो.म्हापणकर)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
२) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा.मंत्री (अन्न व नागरी पुरवठा) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा.राज्यमंत्री (सा.प्र.)यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
६) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १, मुंबई,
७) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र २, नागपूर,
८) महालेखापाल(लेखापरिक्षा),महाराष्ट्र-१,मुबई/महालेखापाल (लेखापरिक्षा),महाराष्ट्र-२,नागपूर,
९) प्रधान सचिव व वि.चौ.अ.१,सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
१०) उ.स. (स्वासैकक्ष), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
११) सर्व विभागीय आयुक्त,
१२) जिल्हाधिकारी(नागपूर,बुलढाणा,सातारा)
१३) निवासी लेखा परिक्षा अधिकारी, मुंबई,
१४) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
१५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१६) सामान्य प्रशासन विभाग, का.२५, मंत्रालय, मुंबई
१७) क.अ. वित्त विभाग, (अर्थ संकल्प १३ / व्यय-४) मंत्रालय, मुंबई
१८) क.अ. (स्वासैक २/३), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय,मुंबई ३२
१९) निवडनस्ती- (स्वासैक १)

					विवरणपत्र							
आणीबाणी मानधन रकमेचा तपशील												
अ.क्र	जिल्हा	मानधन धारकांची संख्या								एकूण संख्या	एकूण दरमहा मानधन (रूपये)	एकूण मानधन (रूपये) माहे १/१/२०१८ ते ३१/०३/२०१९
		1 महिना किंवा अधिक कारावास भोगलेले				1 महिन्यापेक्षा कमी कारावास						
		स्वतः	रु. १०,०००/- प्रमाणे	पती/पत्नी	रु. ५,०००/- प्रमाणे मानधन	स्वतः	रु. ५,०००/- प्रमाणे मानधन	पती/पत्नी	रु. २५००/- प्रमाणे मानधन			
१	**नागपूर** (दुसरी यादी)	२२	२२००००	६	३००००	०	०	०	०	२८	२५००००	३७५०००
२	नागपूर (तिसरी यादी)	१५९	१५९००००	२८	१४००००	४	२००००	०	०	१९१	१७५००००	२६२५००००
३	**बुलढाणा** (दुसरी यादी)	४२	४२००००	२०	१०००००	७७	३८५०००	४८	१२००००	१८७	१०२५०००	१५३७५०००
४	सातारा(दुसरी यादी)	८	८००००	२	१००००	१२	६००००	०	०	२२	१५००००	२२५००००
	एकूण	**२३१**	**२३१००००**	**५६**	**२८००००**	**९३**	**४६५०००**	**४८**	**१२००००**	**४२८**	**३१७५०००**	**४७६२५०००**